मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तेरे जैसा यार कहा, कहा ऐसा याराना.. !

## सचिन साठे सोशल फाउंडेशनतर्फे 'दिवाळी पहाट व फराळ' कार्यक्रम उत्साहात : शंकर जगताप आणि सचिन साठे यांनी सादर केलेल्या गाण्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पिंपरी | प्रतिनिधी**

सण, संस्कृती आणि समाज प्रबोधन व संघटन यांचा सुंदर संगम सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने दोन दिवसीय दिवाळी पहाट या कार्यक्रमात पहायला मिळाला आहे. या उपक्रमामुळे नव कलाकारांना व्यासपीठ मिळाले, नागरिकांम ध्ये सांस्कृतिक चळवळ जागृत करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. मी माझे मित्र सचिन साठे आणि त्यांच्या फाउंडेशनच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे याबद्दल अभिनंदन करतो, तसेच सर्व नागरिकांना दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा देतो असे गौरवउद्गार आमदार शंकर जगताप यांनी काढले.

दिवाळी निमित्त पिंपळे निलख येथे सचिन साठे सोशल फाउंडेशन तर्फे दोन दिवसीय "शुभ दिवाळी पहाट – फराळ" हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शनिवारी (१८ ऑक्टोबर) देवांग कोष्टी कार्यालय, शारदा कॉलनी येथे आणि रविवारी (१९ ऑक्टोबर) विशाल नगर, पिंपळे निलख येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये संगीत, मैत्री आणि सणाचा उत्साह यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमातील उत्साह शिगेला पोहोचला असताना आमदार शंकर जगताप आणि आयोजक सचिन साठे यांनी आपल्या महाविद्यालयीन काळातील जुन्या आठवणींना उजाळा देत "तेरे जैसा यार कहा, कहा ऐसा याराना, याद करेगी दुनिया, तेरा मेरा अफसाना" हे गाणे सादर केले भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी उत्साह वाढवला. या अप्रतिम सादरीकरणाने दोघांच्या मैत्रीतील आपुलकी, जिव्हाळा आणि वर्षानुवर्षांच्या नात्याचा स्नेह प्रकट झाला. उपस्थित प्रेक्षकांनी याला उत्स्फूर्त दाद दिली.

भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, दिवाळीचा आनंद नागरिकांनी एकत्र येऊन साजरा करण्याची ही परंपरा अत्यंत सुंदर आहे. सचिन साठे आणि त्यांच्या फाउंडेशनचे मनःपूर्वक अभिनंदन

स्वागत, प्रास्ताविक करताना आयोजक सचिन साठे म्हणाले की, नकारात्मकतेवर मात करून सकारात्मकतेचा, प्रकाशाचा मार्ग दाखवणारा सण म्हणजे दिवाळी. 'दिवाळी पहाट – फराळ' या उपक्रमामुळे संगीत, संस्कृती आणि आपले स्नेहबंध आणखी दृढ करण्याचा क्षण आहे.

यावेळी भुलेश्वर नांदगुडे, नितीन इंगवले, दिलीप बालवडकर, विजय जगताप, अनंत कुंभार, अनिल संचेती, अरविंद रणदिवे, गणेश कस्पटे, जेष्ठ नागरिक पिंपरी चिंचवड महासंघाचे अध्यक्ष वृषालीताई मरळ, सुरेश साठे, आप्पा थोपटे आदींसह परिसरातील नागरिक, युवा, महिला, विविध संस्था प्रतिनिधी उपस्थित होते.

### 'दिवाळी पहाट' प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय

**» पहिल्या दिवशी स्वरधारा म्युझिकल ग्रुप यांनी हिंदी, मराठी गीतांचा कार्यक्रम सादर केला. दुसऱ्या दिवशी स्वरानंद म्युझिकल ग्रुप तर्फे डॉ. विजय पाटील, अश्विन भुते, सतीश इंगळे, पृथ्वीराज इंगळे, बबन ठोंबरे, किशोर देशमुख, विश्वास करंजे, सोमनाथ बरगुजे, स्मिता पाटील, मंगला जगताप, वैष्णवी शेवंते आणि गार्विका सोलंकी या स्थानिक कलाकारांनी सादरीकरण केले. सकाळच्या उत्साहपूर्ण वातावरणात, विविध कलाकारांनी सादर केलेल्या उत्कृष्ट जुन्या, नव्या सुरेल संगीत रचना यामुळे ही 'दिवाळी पहाट' प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय ठरली.**

# वाकडमध्ये रंगली दिवाळीची सुरेल रात्र.. !

## गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल आवाजात 'लाईव्ह इन कॉन्सर्ट'



**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक राहुल कलाटे आयोजित वाकड व परिसरातील नागरिकांनी एक अविस्मरणीय संगीत-गीत संध्या अनुभवली. प्रख्यात गायिका बेला शेंडे यांच्या मधुर सुरांनी सजलेला 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' व दिवाळी फराळ कार्यक्रम येथील कै. तानाजीभाऊ तुकाराम कलाटे उद्यानात मोठ्या उत्साहात पार पडला.

संध्याकाळी प्रकाशझोतांत आणि फुलांच्या सजावटीत न्हालेल्या कलाटे उद्यानात वाकड आणि परिसरातील नागरिकांची कुटुंबियांसमवेत गर्दी उसळली होती. बेला शेंडे, सहकारी गायक व वाद्य वृंदांच्या साथीने एकशे बढकर एक गाण्यांनी सजलेली ही दिवाळीची रात्र सर्वांच्या मनात कायमची घर करून गेली. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या उस्फुर्त प्रतिसादात दिवाळी फराळ आणि सांगितीक मेजवानीच्या अनोख्या सोहळ्याचा मनमुराद आस्वाद नागरिकांनी घेतला.

आयोजक राहुल कलाटे या प्रसंगी बोलताना म्हणाले, परिसरातील नागरिकांनी दिवाळीच्या शुभमुहूर्तावर कुटुंबासह आनंदाचा व सांस्कृतिक अनुभूतीचा सोहळा अनुभवावा, यातून विचारांची देवाण-घेवाण व्हावी, स्नेह-ऋणानुबंध आणखी वृंद्धीगत व्हावेत या हेतूने ह्या सोहळ्याचे आयोजन केले आहे. शिट्ट्या आणि टाळ्यांच्या कडकडाटात बेला शेंडे यांनी सादर केलेल्या आता वाजले की बारा ह्या तुफान लावणीने कार्यक्रमाची सांगता झाली. शेवटी फटाक्यांच्या आतषबाजीत आकाश उजळून निघाले होते.

### वन्समोर आणि टाळ्या-शिट्ट्यांची साद..

**» बेला शेंडे यांनी "कह दो ना तुम मुझे भूल गए हो...", "पिया बासे रे मोरे नयना में", "मन उधाण वाऱ्याचे" अशा सुरेल गाण्यांमधून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मंगलास्टक वन्स मोरमधील गुण गुणावे गीत सारे, मला वेड लागले प्रेमाचे, मुंबई-पुणे-मुंबईतील कधी तू आणि का कळेना, टाईमपासमधील धुंद कळ्यांना वेलींना या गीतांसह राती अर्ध्या राती, आता वाजले की बारा ह्या लावणीला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेत ठेका धरला. वन्समोर आणि टाळ्या-शिट्ट्यांच्या कडकडाटात परिसर दणाणून गेला होता.**

# गौणखनिज उत्खनन, रॉयल्टीतून 12 कोटीचा महसूल जमा

## पिंपरी-चिंचवड अप्पर तहसिल कार्यालयाकडून कारवाई, गौणखनिज उत्खनन व रॉयल्टीची विक्रमी वसुली केल्याचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड अप्पर तहसिल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एप्रिल २०२४ पासून सप्टेंबर २०२५ अखेर गौणखनिज उत्खनन व रॉयल्टीतून तब्बल १२ कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे.

पिंपरी-चिंचवड अप्पर तहसिल कार्यालय कार्यक्षेत्रात एप्रिल २०२४ पासून यंदाच्या सप्टेंबर पर्यंतचा गौणखनिज उत्खनन व रॉयल्टीची विक्रमी वसुली केल्याचा दावा अधिका-याकडून केला जात आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत रॉयल्टची प्रकरणे आणि महसुलाची रक्कम यंदा वाढण्याची अपेक्षा आहे. वाळू, मुरूम, खडी, दगड आदी गौण खनिजांचे उत्खनन आणि वाहतुकीतून मिळणाऱ्या महसुलाचा अहवालातून ही आकडेवारी समोर आली आहे.



### अवैध उत्खननाबाबत वाढल्या तक्रारी

» पिंपरी-चिंचवड शहरात अनेक ठिकाणी अवैध उत्खनन सुरू आहे. त्याबाबत शहरातील नागरिक सतत तक्रारी करत आहेत. काही जणांनी या बाबत उपोषणाचाही इशारा दिला आहे. रीतसर परवानगी आणि रॉयल्टीमधून उत्पन्न घेत असल्याचा दावा कार्यालय करत असले तरी प्रत्यक्षात कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत.

तहसिल कार्यक्षेत्रातील विविध प्रशासनिक कार्यालयांनीही उत्खनन व वाहतूक परवानग्या दिल्या आहेत. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म शाखेने गेल्या वर्षी १०, तर यंदा ११ प्रकरणांमध्ये परवानग्या दिल्या. हवेली उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून २०२४ मध्ये २०, तर यंदा ३७ प्रकरणांमध्ये उत्खनन व वाहतूक परवानग्या देण्यात आल्या.

या परवानग्यांमुळे बांधकाम क्षेत्र, रस्ते विकास आणि इतर नागरी प्रकल्पांना आवश्यक असणारे कच्चे साहित्य उपलब्ध होत असून स्थानिक महसुली उत्पन्नालाही चालना मिळाली आहे. प्रशासनाकडून या सर्व परवानग्यांवर देखरेख ठेवली जात असून, नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात असल्याची माहिती अप्पर तहसिल कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### रॉयल्टी

» वर्ष : प्रकरणे : जमा महसुल
» २०२४ – १८९ : ५ कोटी ३८ लाख ७२ हजार २६३
» २०२५ – १६९ : ४ कोटी ४६ लाख ९८ हजार १३६

### उत्खनन

» २०२४ – १२ कोटी ४९ लाख ११ हजार ७६३
» २०२५ – ७ कोटी ८४ लाख २८ हजार २२१

> पिंपरी-चिंचवड परिसरात गेल्या दोन वर्षांत गौण खनिज बाबत नियोजित पद्धतीने कारभार सुरू आहे. शासन महसूल वाढविण्यात या विभागाने सातत्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. तक्रारींवर कारवाई केली आहे. अनेकांवर दंडात्मक कारवाई केली आहे.
>
> - जयराज देशमुख, अप्पर तहसीलदार, पिंपरी-चिंचवड

# मैलामिश्रित पाणी थेट 'पवने'त; नागरी आरोग्य धोक्यात

## चिखली, जाधववाडीतील जाधव कमानीपासून गेलेल्या नैसर्गिक नाल्यामध्ये सांडपाणी सोडल्याने आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची जीवनदायिनी अशी ओळख असलेल्या पवना नदीच्या पात्रात अनेक ठिकाणी मैलामिश्रित पाणी सोडले जाते. पिंपळे गुरव, नवी सांगवी, जुनी सांगवी या भागांमध्ये पवना नदीत मैलामिश्रित पाणी थेट नदीत सोडले जात असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, परिसरात घाण व दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरी आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आजूबाजूच्या रहिवाशांकडून केली जात आहे.



पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यातून पवना नदी वाहते. शहरातून वाहणाऱ्या नदीपात्राचे अंतर २४.४० किलोमीटर आहे. पिंपळे गुरव येथील लक्ष्मीनगर, भालेकरनगर येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे. या भागात सांडपाणी वाहिन्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मात्र, सांडपाणी वाहिन्यांमधून गळती होत असून, वाहिन्यांच्या झाकणावरून ओसंडून सांडपाणी वाहत आहे. त्यामुळे हे मैलामिश्रित पाणी थेट नदीपात्रात मिसळून पवना नदीचे प्रदूषण वाढत आहे. चिखली, जाधववाडीतील जाधव कमानीपासून गेलेल्या नैसर्गिक नाल्यामध्ये सांडपाणी सोडल्याने परिसरातील गृहनिर्माण सोसायटीधारकांसह बैठ्या घरांमध्ये राहणाऱ्यांना दुर्गंधीसह आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

या परिसरातून दररोज विद्यार्थी, कामगार आणि वाहनचालक ये-जा करतात. दुर्गंधी आणि घाणीमुळे रस्त्याने चालणेही अवघड झाले आहे. पिंपळे गुरवच्या मुख्य चौकामध्ये तुळजाभवानी मंदिर असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. पाण्यातून येणारी दुर्गंधी आरोग्यास धोकादायक ठरत आहे.

सांडपाणी थेट नदीत मिसळल्याने नदीच्या पाण्याची गुणवत्ता घसरली असून, परिसरात डासांचा प्रादुर्भाव, दुर्गंधी आणि प्रदूषण वाढले आहे. परिणामी, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नाल्यांमध्ये सांडपाणी वाहिन्यांतील पाणी सोडू नका, अशी मागणी नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे सातत्याने केली जात आहे.

महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला. सांडपाणी वाहिनीतील पाणी नाल्यात सोडू नये, यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. परंतु, प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे, असा आरोप जाधववाडी येथील विजय डोके यांनी केला.

### रहिवाशांच्या मागण्या

» पंपिंग स्टेशनमधील गाळाची तातडीने सफाई करावी.
» सांडपाण्याच्या वाहिन्यांमधील गळती दुरुस्त करावी.
» पवना नदीपात्रात मिसळणारे सांडपाणी थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाय करावेत.
» नदीकाठ स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम राबवावी.

# पुण्यातील जैन मंदिर जमीन व्यवहाराविरोधात वसंत मोरे मैदानात

## "एक पुणेकर म्हणून मी रवींद्र धंगेकर यांच्या पाठीशी आहे", असं वक्तव्य वसंत मोरे यांनी केलं आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊसच्या जमिनीच्या विक्रीविरोधात उभ्या राहिलेल्या लढ्याला सोमवारी (२० ऑक्टोबर) पहिलं यश मिळालं. मुंबई येथे धर्मादाय आयुक्तालयात याप्रकरणी सुनावणी पार पडली. धर्मादाय आयुक्त अमोघ कलोटी यांनी या प्रकरणावर 'स्टेटस्को' म्हणजेच परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिला आहे. या कथित जमीन विक्रीच्या घोटाळ्याविरोधात लढत असलेले शिवसेनेचे (शिंदे) नेते तथा माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना आता जनतेचा व इतर नेत्यांचा पाठिंबा मिळू लागला आहे. शिवसेनेचे (उबाठा) नेते वसंत मोरे यांनी देखील धंगेकर यांना पाठिंबा दिला आहे.

"एक पुणेकर म्हणून मी रवींद्र धंगेकर यांच्या पाठीशी आहे", असं वक्तव्य वसंत मोरे यांनी केलं आहे. धंगेकर यांची पाठराखण करत मोरे म्हणाले, सत्तेत असूनही ते एखादा विषय लावून धरत आहेत, त्याबद्दल त्यांचं कौतुक करायला हवं."

"रवींद्र धंगेकर एखादी खरी बाजू मांडत असतील तर तुम्ही ती स्वीकारायला हवी. 'भटकी कुत्री' किंवा अन्य कुठलीही खालच्या पातळीवरील टीका करत असाल तर तुम्ही भाजपावाले लोक तुमची पात्रता दाखवत आहात असंच म्हणावं लागेल."

"एखादी व्यक्ती खरं बोलत असेल तर तुम्ही ते ऐकलं पाहिजे. रवींद्र धंगेकर खोटं बोलत असते तर धर्मादाय आयुक्तांनी त्या व्यवहारावर स्थगिती दिली नसती. आयुक्तांनी स्थगिती दिली आहे याचा अर्थ कुठेतरी पाणी मुरतंय. रवींद्र धंगेकर खरं बोलत असावेत."

भारतीय जनता पार्टीचे नेते त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करू लागले आहेत. भाजपाकडून त्यांच्याबद्दल 'भटकी कुत्री' अशी टिप्पणी केली गेली. यावर वसंत मोरे यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी स्वतःची पातळी घालवली आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देऊन ते स्वतःची पातळी काय आहे ते दाखवून देत आहेत."

धंगेकर यांनी एखादा विषय हाती घेतला तर ते लावून धरतात. पुण्यातील एखादी व्यक्ती, एखाद्या पक्षाचा पदाधिकारी, या शहराचा नागरिक म्हणून शहरात शांतता राहावी यासाठी प्रयत्न करत असेल, शहरातील जमिनी कोणी बळकाऊ नये यासाठी प्रयत्न करत असेल तर आपण त्या व्यक्तीचं समर्थन केलं पाहिजे."



### ...तर धंगेकर यांचं समर्थ करायला हवं

» "मी रवींद्र धंगेकर यांना ओळखतो. ते अभ्यासपूर्ण काम करतात आणि मला त्यांच्या कामाची माहिती आहे. धंगेकर यांनी एखादा विषय हाती घेतला तर ते लावून धरतात. पुण्यातील एखादी व्यक्ती, एखाद्या पक्षाचा पदाधिकारी, या शहराचा नागरिक म्हणून शहरात शांतता राहावी यासाठी प्रयत्न करत असेल, शहरातील जमिनी कोणी बळकाऊ नये यासाठी प्रयत्न करत असेल तर आपण त्या व्यक्तीचं समर्थन केलं पाहिजे."

### भाजपावाल्यांनी पातळी घालवली आहे : वसंत मोरे

» रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊसच्या जमीन विक्रीच्या घोटाळ्याचा विषय लावून धरल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे नेते त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करू लागले आहेत. भाजपाकडून त्यांच्याबद्दल 'भटकी कुत्री' अशी टिप्पणी केली गेली. यावर वसंत मोरे यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी स्वतःची पातळी घालवली आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देऊन ते स्वतःची पातळी काय आहे ते दाखवून देत आहेत."

### "मी रवींद्र धंगेकर यांच्या पाठिशी"

» वसंत मोरे म्हणाले, "सदर जमीन ही जैन विद्यार्थ्यांसाठी आहे. त्या जागेवर कोणीतरी गोखले नावाचा बांधकाम व्यवसायिक येतो आणि तिथे मॉल बांधायचा प्रयत्न करतो, तिथल्या जैन समुदायाला हटवण्याचा प्रयत्न होत असेल आणि त्याविरोधात जैन धर्मीय रस्त्यावर उतरत असतील तर त्यात काहीही चुकीचं नाही. एक पुणेकर म्हणून मी रवींद्र धंगेकर यांच्या पाठीशी आहे."

---

# धरणांतील प्रदूषण रोखण्यासाठी PMRDA चा 300 कोटींचा 'मास्टर प्लॅन'

## सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठीचे केंद्र उभारण्यासाठीचा आराखडा तयार करण्यात आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमआरडीएच्या हद्दीतील पश्चिम भागातील १२० गावांमध्ये सांडपाणी वाहिन्यांचे जाळे उभारण्याबरोबरच सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठीचे केंद्र (एसटीपी) उभारण्यासाठीचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यासाठी सुमारे तीनशे कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, लवकरच निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे लवकरच या गावांमधून येणारे सांडपाणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मिसळण्याच्या प्रकाराला आळा बसणार आहे.

महापालिकेनंतर पीएमआरडीएनेही हद्दीतील नदी सुधार योजना हाती घेतली आहे. त्यासाठी नदीकाठच्या गावांमध्ये सांडपाणी वाहिन्यांचे जाळे उभारणे आणि प्रक्रिया केंद्र उभारण्याचे नियोजन केले होते. त्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती केली होती. या सल्लागार कंपनीने यासंदर्भातील अहवाल प्राधिकरणाला सादर केला आहे.

त्यानुसार पश्चिम भागातील १२० गावे, तर पूर्व भागातील १३० यांच्यासह २३० गावांतील सांडपाणी व्यवस्थापनाचा आराखडा तयार केला आहे. या सर्व गावांमध्ये या कामासाठी सुमारे एक हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार प्राधिकरणाने पहिल्या टप्प्यात पश्चिमेकडील १२० गावांत सांडपाणी वाहिन्यांसह प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

धरणाच्या वरील बाजूस असलेल्या गावांमध्येही सुविधा नसल्याने तेथील सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जाते. तेच पाणी पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मिसळते. धरणाच्या आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे झाली असून, त्यांचेही सांडपाणी नद्यांमध्ये सोडल्याने नद्या, धरणे प्रदूषित होत आहेत. एसटीपी प्रकल्पानंतर या प्रदूषणाला आळा बसणार आहे.




### प्रदूषणाला बसणार आळा..

» पीएमआरडीए हद्दीत आठशेहून अधिक गावे आहेत. या गावांमध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया होत नाही. धरणाच्या वरील बाजूस असलेल्या गावांमध्येही सुविधा नसल्याने तेथील सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जाते. तेच पाणी पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मिसळते. धरणाच्या आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे झाली असून, त्यांचेही सांडपाणी नद्यांमध्ये सोडल्याने नद्या, धरणे प्रदूषित होत आहेत. एसटीपी प्रकल्पानंतर या प्रदूषणाला आळा बसणार आहे."

"पहिल्या टप्प्यात पश्चिम भागातील १२० गावांत सांडपाणी वाहिन्यांचे जाळे निर्माण करणे आणि सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे."

**- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए**

# नगराध्यक्षपदासाठी रस्सीखेच! अजित पवारांसमोर मातब्बर उमेदवारांचे आव्हान

## प्रभाग रचनेनंतर नगराध्यक्ष आरक्षण तसेच प्रभागातील आरक्षणाची सोडत झाल्यानंतर इच्छुकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. प्रभाग रचनेनंतर नगराध्यक्ष आरक्षण तसेच प्रभागातील आरक्षणाची सोडत झाल्यानंतर इच्छुकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. नगराध्यक्षपदासाठी सर्वसाधारण पुरुष आरक्षण असल्याने प्रस्तापिथांमध्ये चुरस पहावयास मिळणार आहे. कोणाला मिळणार नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीची संधी याकडे बारामतीकरांची लक्ष लागले आहे. उमेदवार निवडीत मातब्बर इच्छुकांची संख्या मोठी असल्याने बारामतीच्या मैदानात अजित पवारांचा कस लागणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती नगरपरिषदेवर गेले अनेक वर्ष एकहाती वर्चस्व आहे. यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी पाच वर्ष संधी मिळणार आहे. यंदाचा नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार आहे. तरी नगराध्यक्ष पदासाठी चुरस निर्माण होणार हे मात्र नक्की आहे. नगराध्यक्षपदासाठी अजित पवार हे कोणाला संधी देणार याची चर्चा सध्या शहरात सुरू आहे. अनेक नावांचा समावेश यामध्ये आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सचिन सातव यांच्या नावाची चर्चा केली जात आहे.

ज्येष्ठ माजी नगरसेवक किरण गुजर यांना देखील अजित पवार संधी देऊ शकतात. गेले अनेक वर्ष नगरपरिषद कामकाजाचा किरण गुजर यांना अनुभव आहे. अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. त्याच्या कामाच्या शैलीचा बारामतीकरांना अनुभव आहे. त्यामुळे किरण गुजर हे देखील नगराध्यक्ष पदाचे दावेदार ठरू शकतात. माजी नगराध्यक्ष सुभाष सोमानी हे नाव देखील चर्चेत आहे. सोमानी यांनी यापूर्वी नगराध्यक्ष पदाची कमान सांभाळली आहे. सर्वांना विश्वासात घेऊन कामकाज करणारे व्यक्तिमत्व म्हणून सोमानी यांची ओळख आहे.

अजित पवार गटात किमान पाच ते सहा दिग्गज नेत्यांचा सहभाग आहे. हे सर्वजण नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत आहेत. जमेची बाजू ही आहे की, मातब्बर, मास लीडर असलेले नेते आहेत. त्यामुळे उमेदवारी निवडीपासून अजित पवार यांचा कस लागणार आहे. नगरपरिषदेचा विस्तार पाहता ताकदीनिशी काम करणाऱ्या प्रशासकीय अनुभव तसेच खमक्या नगराध्यक्षाची अजित पवार निवड करणाऱ्या शंका नाही.



### शरद पवारांच्या भूमिकेकडे लक्ष..

**» शरद पवार गट बारामती नगर परिषदेत काय करणार याकडे देखील लक्ष लागले आहे. छत्रपती सहकारी साखर कारखाना, माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या अनुभवानंतर शरद पवार गट बारामती नगरपरिषद ताकतीने लढणार का, याबाबत देखील तर्कवितर्क काढले जात आहेत. शरद पवार गटाने परिषदेची निवडणूक लढवली तर माजी नगराध्यक्ष सदाशिव सातव यांच्या नावाची चर्चा नगराध्यक्ष पदासाठी केली जात आहे. युगेंद्र पवार यांची भूमिका देखील महत्त्वपूर्ण असणार आहे.**

### उमेदवार निवडीत दादांचा कस?

**» अजित पवार गटात किमान पाच ते सहा दिग्गज नेत्यांचा सहभाग आहे. हे सर्वजण नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत आहेत. जमेची बाजू ही आहे की, मातब्बर, मास लीडर असलेले नेते आहेत. त्यामुळे उमेदवारी निवडीपासून अजित पवार यांचा कस लागणार आहे. नगरपरिषदेचा विस्तार पाहता ताकदीनिशी काम करणाऱ्या प्रशासकीय अनुभव तसेच खमक्या नगराध्यक्षाची अजित पवार निवड करणाऱ्या शंका नाही. नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण असेल याची उत्सुकता मात्र बारामतीकरांना लागून राहिले आहे. अजित पवार यापैकी कोणाला संधी देणार का नवीन चेहरा समोर आणणार हे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

---

# खानापूर-डोणजे गटात 'गुप्त' समीकरण ; 'तो' अज्ञात चेहरा प्रस्थापित उमेदवारांची डोकेदुखी वाढवणार!

## आगामी निवडणुकीची रंगत चांगलीच वाढली असून, गट पातळीवर अत्यंत 'गुप्त' राजकीय समीकरणे जुळत असल्याची चर्चा आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खानापूर-डोणजे गटातील आगामी निवडणुकीची रंगत चांगलीच वाढली असून, गट पातळीवर अत्यंत 'गुप्त' राजकीय समीकरणे जुळत असल्याची चर्चा आहे. या 'गुपचूप' हालचालींमुळे वर्षानुवर्षे चालत आलेले राजकीय अंदाज सपशेल चुकण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. सध्या इच्छुकांच्या नावांची गर्दी असली तरी, विद्यमान आमदार भीमराव (अण्णा) तापकीर यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी (पवार गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) या प्रमुख पक्षांचे लक्ष एका 'अज्ञात' किंवा 'अति-महत्वाकांक्षी' उमेदवाराकडे लागून राहिले आहे.

या उमेदवाराने अद्याप पूर्णपणे नाव जाहीर केलेले नसले तरी त्याने पायाला भिंगरी बांधली आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जर 'एक अनुभवी', 'युवा तडफदार' किंवा 'सत्ताधाऱ्यांचा पूर्वीचा समर्थक' उमेदवार मैदानात टिकला, तर तो शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपा या प्रस्थापित पक्षाच्या उमेदवारांची डोकेदुखी वाढवेल. हा तगडा उमेदवार खानापूर-खेड-शिवापूर गटातील किमान 30 ते 40 टक्के पारंपारिक मतपेढी तोडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ही जागा जिंकण्यासाठी विरोधी पक्षांनी जी 'गुपचूप' रणनीती आखली होती, त्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या इच्छुक उमेदवारांच्या अचानक झालेल्या एंट्रीमुळे मोठा 'धक्का' बसू शकतो. या अनपेक्षित एन्ट्रीमुळे प्रमुख पक्षांना आता निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात त्यांची संपूर्ण रणनीती बदलावी लागत आहे, अशी विश्वसनीय माहिती मिळाली आहे.

या गटातील राजकारणावर अनेक वर्षांपासून लक्ष ठेवून असलेल्या राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक गटातील प्रस्थापित नेतृत्वासाठी 'अस्तित्वाची लढाई' ठरणार आहे.

या गटाचा निकाल म्हणजे केवळ उमेदवाराचा विजय नाही, तर ज्या राजकीय नेत्यांचे गटावर वर्चस्व आहे, त्यांच्या भविष्यातील वाटचालीवर प्रश्नचिन्ह उभे करणारा असेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. हा तगडा उमेदवार नेमका कोणाच्या 'शक्ती' वर मैदानात उतरला आहे? तो केवळ मतविभागणी करणार की थेट 'निकाल' बदलणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे मतमोजणीच्या दिवशीच मिळतील. मात्र, तोपर्यंत खानापूर-डोणजे गटातील प्रत्येक मतदाराला 'हा' राजकीय सस्पेन्स अनुभवायला मिळणार आहे, यात शंका नाही!



### खेड शिवापूर विरुद्ध खानापूर-डोणजे पट्टा..

**» गटाचा इतिहास पाहता माजी जि. प. सदस्य नवनाथ पारगे (राष्ट्रवादी – शरद पवार गट) यांचा विशेष प्रभाव डोणजे-खानापूर पट्ट्यात आहे. ज्यामुळे गटातील दोन प्रमुख भागांच्या मतविभागणीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. या विभागांमध्ये होणारी मतविभागणी निर्णायक ठरू शकते.**